**L. A. BILL No. XXII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (३६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— २०१७चा महा. ६.

"(३६क) "महासार्क" याचा अर्थ, कलम ७७क मध्ये विनिर्दिष्ट केलेली महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद, असा आहे ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील,—

(१) खंड (८०) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(८०क) केंद्र सरकारद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आणि राज्य शासनाने स्वीकारलेल्या कोणत्याही शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे;";

(२) खंड (८१) मध्ये, "शासनाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे" या मजकुरानंतर, "आणि या अधिनियमान्वये दिलेल्या अन्य कोणत्याही निदेशांचे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१२) मधील, "कुलपतीची" या मजकुराऐवजी, "व्यवस्थापन परिषदेची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मधील, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४क) कुलगुरूस, जेव्हा अधिष्ठात्याचे पद रिक्त असेल तेव्हा किंवा जेव्हा अधिष्ठाता आजारी असल्यामुळे किंवा अनुपस्थित असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी असमर्थ असेल तेव्हा, अधिष्ठाता त्याच्या पदावर पुन्हा रुजू होईपर्यंत, किंवा यथास्थिति, नवीन अधिष्ठाता कर्तव्य ग्रहण करेपर्यंत, अधिष्ठाता म्हणून काम करण्यासाठी, अधिष्ठाता म्हणून, नियुक्ती करण्याकरिता अर्हताप्राप्त असलेल्या सुयोग्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मधील, पोट-कलम (२) मध्ये, "तीन महिने" या मजकुराऐवजी, "सहा महिने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ मध्ये नवीन कलम ७७क समाविष्ट करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद.

"**७७क.** (१) उच्च शिक्षणातील शिक्षण व संशोधन विषयक बाबींच्या बाबतीतील धोरणे तयार करण्यासाठी आयोगास आणि त्याच्या व्यवस्थापन मंडळास सल्ला देण्यासाठी आणि तसेच शैक्षणिक बाबींमध्ये विद्यापीठांना निदेश देण्यासाठी, महाराष्ट्र राज्य शिक्षण व संशोधन परिषद (महासार्क) या नावाने संबोधण्यात यावयाची एक परिषद असेल.

(२) महासार्कची रचना, कार्ये व कर्तव्ये आणि तिच्या बैठकांतील कामकाज चालविण्याची कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील, त्याप्रमाणे असतील.

(३) महासार्क तिच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, आयोगास सादर करील.

(४) सर्व शैक्षणिक बाबींच्या बाबतीतील महासार्कचे निर्देश, हे विद्यापीठांच्या विद्यापरिषदेवर, विद्याशाखेवर व अभ्यास मंडळावर बंधनकारक असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम ६ याच्या कलम १०० ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १०० मधील, पोट-कलम (५) मध्ये, खंड (क) मध्ये, परंतुका मध्ये "कुलपती" या मजकुराऐवजी, "शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२. ]

[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात
आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]

[ श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

[ विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]

[ विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]

डॉ. विलास आठवले,
सचिव -३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.